तरुण भारत

15 SEP 2024

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# खगोलविज्ञानाच्या क्षेत्राला ध्येयभारित संशोधकांची गरज


## पुण्यातील आयुकाचे संचालक डॉ. आर. श्रीआनंद यांचे प्रतिपादन

प्रतिनिधी
कोल्हापूर

ध्येयभारित संशोधकांची खगोलविज्ञानाच्या क्षेत्राला गरज आहे. त्या दृष्टीने नवसंशोधकांनी तयारीला लागावे, असे आवाहन पुणे येथील इंटर–युनिव्हर्सिटी सेंटर फॉर ॲस्टॉनॉमी अँड ॲस्ट्रोफिजिक्स (आयुका)चे संचालक डॉ. आर. श्रीआनंद यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहात 'खगोलशास्त्र आणि खगोल भौतिकशास्त्रातील समकालीन समस्या–२०२४' या विषयावरील तीनदिवसीय राष्ट्रीय कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. विद्यापीठातील भौतिकशास्त्र अधिविभाग आणि आयुका यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित परिषदेच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के होते, तर प्र–कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती.

डॉ. श्रीआनंद म्हणाले, खगोलशास्त्र आणि खगोल भौतिकशास्त्र या विषयांबाबत विद्यार्थ्यांमध्ये खूप आकर्षण असते. या विषयांमध्ये संशोधन करू इच्छिणाऱ्यात प्रचंड संयम आणि तितकेच कुतूहलही असावे लागते. ध्येयाने भारलेला संशोधकच या क्षेत्रामध्ये काही तरी भरीव काम करू शकतो. ही गुणवैशिष्ट्ये विद्यार्थ्यांनी स्वत:मध्ये विकसित करावीत. अशा संशोधकांची 'आयुका'ला, देशाला मोठ्या प्रमाणात गरज आहे. भूगुरुत्वाकर्षण तरंग लहरी खूपच क्षीण असतात. या लहरींचे स्वरुप, अस्तित्वशोध आणि त्यांचे परिणाम यांच्याविषयी संशोधनाच्या अमाप संधी आहेत. खगोलभौतिकीच्या क्षेत्रामध्ये डाटा विश्लेषणाचे कामही खूप किचकट असते. त्यासाठी उच्च बौद्धिक क्षमता असणारे संशोधक आणि उपकरणेही आवश्यक असतात.




कोल्हापूर :राष्ट्रीय कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी मार्गदर्शन करताना 'आयुका'चे संचालक डॉ. आर. श्रीआनंद. सोबत प्र–कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के आणि डॉ. राजेंद्र सोनकवडे.

प्र–कुलगुरू डॉ. पाटील म्हणाले, आकाशगंगा, कृष्णविवर, प्रकाशलहरी, विद्युतचुंबकीय लहरी यांसह अनेक क्षेत्रांत संशोधनास वाव आहे. विद्यार्थ्यांनी त्यात रस घ्यायला हवा.

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, 'आयुका'मध्ये विद्यार्थ्यांना ऑन–जॉब प्रशिक्षणास प्रेरित करणे, विविध विद्याशाखांमधील शिक्षकांचे गट करून 'आयुका'समवेत संयुक्त संशोधन प्रकल्प हाती घेणे आणि पन्हाळा येथील शिवाजी विद्यापीठाचे अवकाश संशोधन केंद्राचे आयुकाच्या सहकार्याने सक्षमीकरण करणेबाबत विद्यापीठ सकारात्मक आहे.

डॉ. राजेंद्र सोनकवडे यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. डॉ. एस. पी. दास यांनी परिचय करून दिला. डॉ. व्ही. एस. कुंभार यांनी आभार मानले. यावेळी ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. सी. डी. लोखंडे, 'आयुका'चे डॉ. संदीप मित्रा, डॉ. आर. एस. व्हटकर, आर. एन. घोडपागे, जे. अहंगर, डॉ. के. वाय. राजपुरे, डॉ. ए. व्ही. मोहोळकर, डॉ. एन. एल. तरवाळ, डॉ. एम. व्ही. टाकळे, डॉ. एम. आर. वाईकर, डॉ. ए. आर. पाटील, डॉ. एस. एस. पाटील आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
1 5 SEP 2024 लोकमत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# ‘खगोल विज्ञान क्षेत्राला ध्येयवादींची गरज’

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : ध्येयभारीत संशोधकांची खगोल विज्ञानाच्या क्षेत्राला गरज आहे. त्यादृष्टीने नवसंशोधकांनी तयारीला लागावे, असे आवाहन पुणे येथील इंटर-युनिव्हर्सिटी सेंटर फॉर ॲस्टॉनॉमी ॲंड ॲस्ट्रोफिजिक्स (आयुका)चे संचालक डॉ. आर. श्रीआनंद यांनी शुक्रवारी केले.



शिवाजी विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहात ‘खगोलशास्त्र आणि खगोल भौतिकशास्त्रातील समकालीन समस्या-२०२४’ या विषयावरील तीनदिवसीय राष्ट्रीय कार्यशाळेचे उद्‌घाटन डॉ. श्रीआनंद यांच्या हस्ते झाले. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के अध्यक्षस्थानी होते. प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील प्रमुख उपस्थित होते.

डॉ. श्रीआनंद म्हणाले, खगोलशास्त्र आणि खगोल भौतिकशास्त्र या विषयांमध्ये संशोधन करू इच्छिणाऱ्यांत प्रचंड संयम आणि तितकेच कुतूहलही असावे लागते.

यावेळी कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, ‘आयुका’समवेत करार, आयुकाचे ऑनलाइन अभ्यासक्रम विद्यापीठाच्या अभ्यासक्रमांशी संलग्नित करून विद्यार्थ्यांना ते करण्यास प्रोत्साहित करणे, ‘आयुका’मध्ये विद्यार्थ्यांना ऑन-जॉब प्रशिक्षणास प्रेरित करणे हे उपक्रम नजीकच्या काळात हाती घेण्याबाबत विद्यापीठ सकारात्मक आहे. भौतिकशास्त्र अधिविभागाचे प्रमुख डॉ. राजेंद्र सोनकवडे यांनी स्वागत केले. डॉ. एस.पी. दास यांनी परिचय करून दिला, तर डॉ. व्ही. एस. कुंभार यांनी आभार मानले. ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. सी. डी. लोखंडे यांच्यासह ‘आयुका’चे डॉ. संदीप मित्रा, डॉ. आर. एस. व्हटकर, आर. एन. घोडपागे, श्री. जे. अहंगर, आयआयजी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
15 SEP 2024
सकाळ

# डेक्कनमध्ये प्रमाणपत्र अभ्यासक्रमांची सुरुवात

कोल्हापूर : डेक्कन इन्स्टिट्युट ऑफ टेक्नॉलॉजी, कोल्हापूर येथे शिवाजी विद्यापीठ आजीवन अध्ययन व विस्तार विभाग यांचे मार्फत सर्टीफिकेट कोर्स इन व्हॅल्युएशन ऑफ इम्मुव्हेबल प्रॉपर्टीज व इंटेरियरस्केप ॲण्ड गार्डन डिझाईन आणि महाराष्ट्र शासन मान्य बिल्डींग साईट सुपरवायझर या अभ्यासक्रमाचा सन २०२४-२५ मध्ये प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांची नवीन बॅच रविवार, दि. १५ रोजी सकाळी १०.०० वा. आयोजित केली आहे.

प्रमुख पाहुणे म्हणून इंजि. अतुल शिंदे, निर्मिती इंजिनीअर्स, कोल्हापूर उपस्थित राहणार आहेत. प्रवेश घेऊ इच्छूकांनी डेक्कन इन्स्टिट्युट ऑफ टेक्नॉलॉजी, कॉसमॉस कमर्शियल कॉम्प्लेक्स, स्टेशन रोड, न्यू शाहूपुरी, कोल्हापूर येथे संस्थेशी संपर्क साधावा.